REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# बी.एड्. प्रशिक्षणार्थीसाठी ई-वर्तमान पत्राचे वाचन उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**डॉ. पांढरे विद्युलता ज्ञा.**
प्राचार्या, उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर.

**सारांश :-**

'Life is meaning less without Education' शिक्षण व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, शारीरिक, नैतिक राष्ट्रीय, भावनात्मक व ज्ञानात्मक अशा सर्वांगीण विकासासाठी विविध घटक महत्त्वपूर्ण ठरतात. त्यामध्ये सद्यस्थितीसंदर्भात विकास करण्यासाठी 'वर्तमानपत्र' महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतू तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे वर्तमानपत्र वाचनाकडे दुर्लक्ष होते. तंत्रज्ञान आणि वाचन याची जुळणी करुन आज विद्यार्थी विकास करणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना :-**

शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सद्यस्थिती, चालू घडामोडी इ. यांची माहिती घेणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू आज ही माहिती प्राप्त करण्यासाठी वाचन करण्याचा कल विद्यार्थ्यांचा कमी होत आहे. आज वाचनासाठी वेळ विद्यार्थी उपलब्ध करुन घेत नाहीत. शिवाय वाचनाचा विद्यार्थ्यांना कंटाळा येतो. विद्यार्थी बराचसा वेळ स्वतः मोबाईलवर घालवतात. मोबाईलमुळे वाचनापासून अलिप्त राहतात. त्यामुळे वाचनसंस्कृतीचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान जे विद्यार्थी अनावश्यक वेळ त्यावर घालवतात. त्याचाच, सकारात्मक वापर करण्यासाठी ई-वर्तमानपत्र वाचन उपक्रमांचा वापर करुन विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती विकसित करण्याचा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्याचे विकसन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनातून करण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. आजच्या विद्यार्थ्यांला भावी पिढीचा जनक करण्यासाठी वाचन संस्कृती विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भ पुस्तके, इंटरनेट इ. चा व्यवहारात उपयोग करणे अत्यंत आवश्यक असल्याने वाचन संस्कृतीव्दारे विविध घटकांचा विकास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन संशोधकाने करण्याचे निश्चित केले आहे.

**संशोधनाचे महत्त्व :-**

१. बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये वाचनासंबंधी 'वर्तमानपत्र' वाचनात येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मदत होईल.
२. आधुनिक काळात नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होईल.
३. आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग लक्षात येण्यास मदत होईल.



**संशोधनाची गरज :-**

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.
बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये चालू घडामोडी, आधुनिक ज्ञान विकसित करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.
भावी नागरिक हा तंत्रज्ञानाच्या वापराचा योग्य वापर करण्यासाठी सक्षम होणे ही प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

### समस्या विधान :-

बी.एड्. प्रशिक्षणार्थीसाठी ई-वर्तमानपत्र वाचन उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

### संशोधन परिकल्पना :-

'ई-वर्तमानपत्र' वाचन हे पारंपारिक वाचनापेक्षा परिणामकारक आहे.

### शून्य परिकल्पना :-

बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये पारंपारिक वर्तमानपत्रे, वाचन व त्यातून होणारी निष्पत्ती व 'ई-वर्तमानपत्र' वाचनमधून होणारी निष्पत्ती यात सार्थ फरक नाही.

### संशोधन उद्दिष्टे :-

१. बी.एड्. प्रशिक्षणार्थी पारंपारिक वर्तमानपत्र वाचनासंबंधीची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये 'ई-वर्तमानपत्र वाचन' उपक्रम विकसित करणे.
३. बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये पारंपारिक वर्तमानपत्र वाचन आणि 'ई-वर्तमानपत्र वाचन' उपक्रम यांच्यातील परिणामकारकतेचे तुलना करणे.

### संशोधनाची गृहीतके :-

१. बी.एड्. महाविद्यालयात विविध वर्तमानपत्र उपलब्ध आहेत.
२. बी.एड्. महाविद्यालयातील प्रत्येक प्रशिक्षणार्थीच्याकडे मोबाईल, संगणक ज्ञान आहे.

### संशोधनाची व्याप्ती :-

१. प्रस्तुत संशोधनात बी.एड्. प्रशिक्षणार्थीच्या केवळ वर्तमानपत्र वाचनासंबंधी विचार करण्यात आला आहे.
२. प्रस्तुत संशोधनात बी.एड्. प्रशिक्षणार्थीच्या केवळ 'ई-वर्तमानपत्र' वाचनासंबंधी विचार करण्यात आला आहे.

### संशोधनाची मर्यादा :-

१. प्रस्तुत संशोधन हे एका बी.एड् महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.
२. प्रस्तुत संशोधन हे केवळ 'ई-वर्तमानपत्र' वाचन उपक्रमापुरते मर्यादित आहे.

### संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकानी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

### संशोधान कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी बी.एड्. प्रशिक्षणार्थीचे २ समान गट तयार केले. या दोन समान गटांचे 'अ' प्रायोगिक गट, 'ब' नियंत्रित गट असे विभाजन केले. या दोन्ही गटांसाठी 'वाचन' संबंधी (दोन आठवडे) कार्य केले. गट 'अ' वर 'ई-वर्तमानपत्र वाचन' उपक्रम राबविला. गट 'ब' पारंपारिक वर्तमानपत्र वाचन उपक्रम राबविला.

उपक्रमानंतर अंतिम चाचणी घेण्यात आली व प्रापत झालेल्या गुणांवरुन दोन्ही गटाचे मध्यमान, प्रमाण, विचलन, टी मूल्य काढण्यात आले व यावरुन दोन्ही गटांचे सहसंबंध गुणक काढण्यात आले.

| अ.क्र. | मापन | प्रायोगिक गट | नियंत्रित गट |
|---|---|---|---|
| १. | गटातील विद्यार्थी संख्या (N) | $N_{१} = २५$ | $N_{२} = २५$ |
| २. | मध्यमान (M) | $M_{१} = २६.३$ | $M_{२} = १२.५$ |
| ३. | प्रमाण विचलन O | $O_{१} = ३.४२$ | O२ = २.६४ |
| ४. | मध्यमानाची प्रमाणत्रुटी | $M_{१} = ०.५७$ | $M_{२} = ०.५२$ |
| ५. | मध्यमानातील फरक | D = M१ | $M_{२} = १३.८$ |
| ६. | स्वाधीनता मात्रा | $Df = N_{१} + N_{२} = २ = ४५८$ | |
| ७. | प्राप्त t मूल्य | ७.१७ | |

| | | |
|---|---|---|
| ८. | नमूना t मूल्य | २.०४ |
| ९. | शून्य परिकल्पना | |
| | (स्विकार/त्याग) | त्याग |

**निष्कर्ष :-**

१. नियंत्रित गटातील प्रशिक्षणार्थीपेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या चाचणीच्या गुणाक फरक दिसून आला. त्यामुळे शुन्य परिकल्पनेचा त्याग करण्यात अला.
२. पारंपारिक वर्तमानपत्र वाचनापेक्षा 'ई वर्तमानपत्र' वाचनामुळे मोबाईलचा सकारात्मक वापर करण्याकडे प्रशिक्षणार्थीचा कल वाढला.
३. प्रशिक्षणार्थी रिकाम्या वेळात 'ई वर्तमानपत्राव्दारे' विविध माहिती वाचनासाठी प्रवृत्त झाले.
४. प्रशिक्षणार्थीमध्ये बौध्दिक विकासास चालना मिळाली.

**शिफारशी :-**

१. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असणारा मोबाईल त्याचा योग्य वापर करण्याची दिशा शिक्षकांनी देणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थी वर्तनाकडे पालकांनीही लक्ष देणे गरजेचे आहे.
४. विद्यार्थ्यांना मोबाईलवर आधारित प्रात्यक्षिक कार्य द्यावे.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१. जगताप ह. ना. (२००६) शैक्षणिक तंत्रविज्ञान, पुणे, नित्यनुतन प्रकाशन.
२. पंडित बन्सी बिहारी (१९९७), शिक्षणातील संशोधन, प्रथम आवृत्ती, पुणे, नुतन प्रकाशन.
३. भिंताडे वि.रा. (२००४) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नुतन प्रकाशन.